नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/04/2023 (शनिवार) दुपार

---

## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांची कारवाई

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील गुजरखेडी येथे दिनांक ०१/३/२०२३ चे १३/१० वा. ते १५/३० वा. दरम्यान अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबधक कक्ष ना.ग्रा येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारां कडुन माहीती मिळाली की, न्यु रॉयल लॉजींग सावनेर, यश बार अ‍ॅड रेस्टोरंटच्या मागे याचे मालक **आरोपी नामे– अरूण मदनमोहन रूशिया, वय ६१ वर्ष २) मॅनेजर वासु अंसारी दोन्ही रा. वाघोडा सावनेर जि. नागपूर** हे स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता मुलींना पैशाचे आमिश देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांना पुरवुन नमुद ठिकाणी येण्यास सांगुन तेथे देह व्यापारास जागा उपलब्ध करून देउन पिडीत मुलींना ग्राहकास पुरवुन देहव्यापार करवुन घेतो. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून सदरची माहिती ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांना देवुन त्यांचे आदेशाने बोगस पंटर पंचनामा कारवाई करून बोगस ग्राहक पाठवुन व त्याच्या इशाऱ्या प्रमाणे पोलीस स्टाफ सह रेड कारवाई करून आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मपोहवा ज्योती वानखेडे, नेमणुक अनैतीक मानवी प्रतिबधक कक्ष ना.ग्रा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५, अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि फुलेकर मो. नं. ७५८८५६४३०० हे करीत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस उप अधिक्षक श्री. राजेंद्र निकम, महिला पोलीस उपनिरीक्षक मिरा मटाले, महिला पोलीस हवालदार ज्योती लोखंडे, महिला पोलीस शिपाई मालिनी मोहीते, पोलीस शिपाई प्रफुल भातुलकर, निलेश बरडे चालक पोलीस हवालदार आसिफ सय्यद यांनी पार पाडली.

## दगडी कोळसा चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत इंदर कोळसा खदान नं. ०६ चे ओवरबर्डन डंपीग येथे दिनांक ३१/०३/२०२३ चे दुपारी १३/०० वा. सुमारास फिर्यादी नामे– रविकांत रामदास कडे, वय ४५ वर्ष, रा. चनकापुर कॉलोनी खापरखेडा हे खदान नं. ०६ येथे मागील एक वर्षापासुन गार्ड इंचार्ज म्हणुन काम करतात. घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हे इंदर कोळसा खदान नं. ०६ चे ओवरबर्डन डंपीग येथे गस्त करीत असताना पालघर शिवाराजवळ स्प्लेन्डर मो.सा क्र. एमएच– ४० बीक्यु– ३९८६ चा चालक **आरोपी नामे १) मनिष कवडु बरनावे, वय १९ वर्ष, रा. जुनी कामठी** व आणखी एका मोटार सायकलवर **२) फरार आरोपी नामे–२) राकेश गणेश मारबते, रा. जुनी कामठी** ३ बोरी दगडी कोळसा चोरून घेवुन जातांना दिसल्याने फिर्यादीने त्यांना पकडण्याकरीता त्यांचेकडे जात असता एक मोटारसायकल चालक मोटार सायकलसह त्यावरील कोळसा घेवुन पळुन गेला. स्प्लेन्डर मो.सा चालकास पकडुन विचारपुस केली असता त्याने आपले नाव मनिष कवडु बरनावे, रा. जुनी कामठी असे सांगितले व त्याच्या ताब्यातुन स्प्लेन्डर मो.सा क्र. एमएच–

४० बीक्यु— ३९८६  कीमंती अंदाजे २५०००/—रू. व एकुण ६०० किलो अंदाजे किंमती अंदाजे ३६००/—रू चा दगडी कोळसा असा एकुण २८६००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपींनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ./जळते ब. नं. १३५ मो. नं.  ९६७३८३७००७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर